बल्लारपूरच्या सुरक्षेसाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांची जोरदार मागणी ; मुख्यमंत्र्याचे तातडीने कार्यवाहीचे निर्देश

गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी अत्याधुनिक सीसीटीव्ही सर्व्हेलन्स प्रणाली उभारण्याची आ.मुनगंटीवार यांची मागणी

अपर मुख्य सचिव (गृह) यांना 'अ'प्रमाणे  तात्काळ कार्यवाही करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

चंद्रपूर - बल्लारपूर शहरातील नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी आणि वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी अत्याधुनिक सीसीटीव्ही सर्व्हेलन्स प्रणाली उभारण्याची मागणी केली आहे. यासाठी तातडीने तांत्रिक मान्यता देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी विनंती त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे केली. या मागणीची तत्काळ दखल घेत मुख्यमंत्र्यांनी अपर मुख्य सचिव (गृह) यांना 'अ' प्रमाणे तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. नागरिकांना सुरक्षित वातावरणात निर्भयपणे वावरता यावे आणि पोलिसांना गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळविता यावे, या व्यापक जनहिताच्या भूमिकेतून आ. मुनगंटीवार यांनी हा विषय शासनदरबारी मांडला आहे.

बल्लारपूर शहरातील नागरिकांची सुरक्षितता अधिक भक्कम करण्यासाठी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठा, संवेदनशील ठिकाणे तसेच प्रवेश व निर्गमन मार्गावर अत्याधुनिक सीसीटीव्ही सर्व्हेलन्स प्रणाली उभारण्याची आवश्यकता मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली आहे. औद्योगिक व व्यापारीदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या बल्लारपूरमध्ये गंभीर गुन्ह्यांना प्रतिबंध घालणे, संशयास्पद हालचालींवर प्रभावी नजर ठेवणे आणि पोलिसांच्या तपासकार्यात आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेणे, या उद्देशाने ही मागणी आ.मुनगंटीवार यांनी केली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेशी निगडित या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन शहराची सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता आ. मुनगंटीवार यांनी अधोरेखित केली.

बल्लारपूर शहरातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी अत्याधुनिक सीसीटीव्ही सर्व्हेलन्स प्रणाली उभारण्याच्या दृष्टीने आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांच्या मागणीनुसार, चंद्रपूरच्या पोलीस अधीक्षकांनी यासंदर्भातील सविस्तर प्रस्ताव गृह विभागाकडे सादर केला आहे. या प्रणालीअंतर्गत शहरातील प्रमुख व संवेदनशील ठिकाणी उच्चक्षमतेचे सीसीटीव्ही कॅमेरे, आधुनिक नियंत्रण कक्ष, रेकॉर्डिंग व स्टोरेज व्यवस्था, नेटवर्किंग आणि अखंडित वीजपुरवठ्यासाठी आवश्यक सुविधा उभारण्याचे प्रस्तावित आहे. या यंत्रणेमुळे संशयास्पद हालचालींवर प्रभावी नजर ठेवणे, गुन्ह्यांच्या तपासासाठी दृश्य पुरावे उपलब्ध करणे आणि शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यास मदत होणार आहे.

आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी बल्लारपूरच्या नागरिकांना सुरक्षित वातावरण मिळावे आणि शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट व्हावी, या उद्देशाने अत्याधुनिक सीसीटीव्ही सर्व्हेलन्स प्रणाली उभारण्याचा विषय सातत्याने शासनदरबारी मांडला आहे. त्यांच्या या मागणीची मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी तातडीने दखल घेऊन संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत. या प्रस्तावाला तांत्रिक मान्यता मिळून आवश्यक निधी उपलब्ध झाल्यास गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासोबतच नागरिकांच्या मनात सुरक्षिततेचा विश्वास अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे.

# सुधीर मुनगंटीवार
माजी मंत्री
विधानसभा सदस्य, महाराष्ट्र


वंदे मातरम् १५०

1350 / ऑक्टोबर / 2026 08.10.2026

अ.मु.स.-गृह
'अ' प्रमाणे कार्यवाही करावी

मुख्यमंत्री सचिवालय
दिनांक :- 09.10.2026
ई. ऑफिस क्र. 11087629

प्रति,

मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस
मुख्यमंत्री
महाराष्ट्र शासन, मंत्रालय
मुंबई–32

सप्रेम वंदेमातरम्.

मुख्यमंत्री
महाराष्ट्र शासन
मंत्रालय

विषय : बल्लारपूर शहरातील कायदा व सुव्यवस्था सक्षम करण्यासाठी अत्याधुनिक सीसीटीव्ही सर्व्हेलन्स प्रणाली उभारण्याच्या प्रस्तावास तातडीने तांत्रिक मान्यता देवुन निधी उपलब्ध करून देण्याबाबत. 'अ'

संदर्भ : मा. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांचे कार्यालयीन पत्र क्र./पोअचं/रजि-1/डीपीआर सीसीटिव्ही/बल्लारपूर/2026/3385 चंद्रपूर, दि. 08.10.2026

महोदय,

बल्लारपूर शहर हे चंद्रपूर जिल्ह्यातील महत्वाचे औद्योगिक व व्यापारी शहर असून शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठा, संवेदनशील ठिकाणे तसेच प्रवेश व निर्गमन मार्गावर सुरक्षिततेच्या दृष्टीने याशिवाय खून, घरफोडी, चोरी या सारख्या गुन्ह्यांमध्ये होत असलेली लक्षणीय वाढ लक्षात घेता शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम व प्रभावी करण्यासाठी अत्याधुनिक सीसीटीव्ही सर्व्हेलन्स प्रणाली उभारणे आवश्यक झाले आहे.

याअनुषंगाने मा. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांनी बल्लारपूर शहरासाठी सीसीटिव्ही सर्व्हेलन्स प्रणाली उभारण्याचा सविस्तर प्रस्ताव गृहविभागाकडे सादर केला आहे. सदर प्रस्तावामध्ये सर्व्हेलन्स प्रणाली अंतर्गत शहरातील आवश्यक व संवेदनशील ठिकाणी उच्चक्षमतेचे सीसीटिव्ही कॅमेरे बसविणे, नेटवर्किंग व कम्युनिकेशन व्यवस्था, नियंत्रण कक्ष, कंट्रोल रूम रेकॉर्डींग व स्टोरेज व्यवस्था, आवश्यक वीज पुरवठा बॅकअप, मॉनिटरिंग प्रणाली तसेच संबंधित तांत्रिक पायाभूत सुविधा उभारणे आदि बाबी प्रस्तावित आहे.


पत्ता : भाग्यश्री गोल बाजार वार्ड, चंद्रपूर-४४२ ४०२, महाराष्ट्र, भारत
दुरध्वनी (कार्या.) ०७१७२-२५२५८२, (निवास) ०७१७२-२७३९०० (मो.) +९१-७७२२०७४१९९, प्रसाद उकीर्डे (PA) - +९१-९९७५२३४३४४
+91-7722074199 SudhirMungantiwar Sudhir.Mungantiwar https://sudhirmungantiwar.com
@SMungantiwar @SudhirMungantiwar sudhirbhau.mungantiwar@gmail.com bjp03069@gmail.com

# सुधीर मुनगंटीवार

माजी मंत्री

विधानसभा सदस्य, महाराष्ट्र

वंदे मातरम् १५०


त्यामुळे वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर तसेच नागरीकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बल्लारपूर शहरासाठी अत्याधुनिक सीसीटीव्ही सर्व्हेलन्स प्रणाली उभारण्यास तातडीने तांत्रिक मान्यता देवुन आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत आपल्या स्तरावरून संबंधिताना निर्देश द्यावेत, ही विनंती.

कार्यवाहीची रूपरेषा मला कळविल्यास मी आपला आभारी राहील.

योग्य सहकार्याची अपेक्षा

सविनय धन्यवाद !

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रत :

मा. पोलिस अधिक्षक

चंद्रपूर


पत्ता : भाग्यश्री गोल बाजार वार्ड, चंद्रपूर-४४२ ४०२, महाराष्ट्र, भारत

दुरध्वनी (कार्या.) ०७१७२-२५२५८२, (निवास) ०७१७२-२७३९०० (मो.) +९१-७७२२०७४१९९, प्रसाद उकीर्डे (PA) - +९१-९९७५२३४३४४

+91-7722074199 SudhirMungantiwar Sudhir.Mungantiwar https://sudhirmungantiwar.com

@SMungantiwar @SudhirMungantiwar sudhirbhau.mungantiwar@gmail.com bjp03069@gmail.com